# एका नृत्याचा जन्म

**भारत सासणे**

'य स्याहं अनुगृहयामि हरिष्ये तद्धनं शनैः ।'
अर्थ : मी ज्याच्यावर कृपा करतो त्याची संपत्ती कलेकलेने हरण करतो.

हा श्लोक वाचला त्यांनी भागवतात, की गीतेत की कुठेतरी आणि अतीव आश्चर्याने ते भरुन गेले. आतल्या आत. पहिल्यांदा त्यांना खरेच वाटेना. मग त्यांना वाटले की अर्थ चुकीचा असेल. मग वाटलं, आपण काही चुकीचं वाचलं असावं. मग ते पुन्हा आणि पुन्हा तो श्लोक वाचत राहिले, पहाटे, दुपारी, मध्यरात्री. आणि आश्चर्याने भरुन गेले. राजीनामा द्यावा लागल्यानंतर काही अपमानाच्या जखमा झाल्या आहेत. आपण आता प्रमुख प्रवाहात नाही, दुर्लक्षित, अदखलपात्र वर्गात सामील झालो आहोत असे वाटु न देण्यासाठी त्यांनी धार्मिक ग्रंथांचे वाचन सुरु केले आहे.

मंजिरीला त्यांनी सांगितलं. पण तिला वेळच नाही. ती कम्प्युटरवर बसली आहे. ते यंत्र पुन्हा पुन्हा 'हँग' होतं आहे. ती चिडुन आहे. तिला कुठलेतरी चर्चासत्र आहे, कुठलातरी 'वर्कशॉप' आहे. ती ऐकत नाही. ते पुस्तक घेऊन घरात फिरतात, गॅलरीत जातात. तिथं झाडांची फांदी आणि फिक्कट निळी फुलं. मुलगी पण 'जॉब' करते आहे. तीही परतलेली नाही. कुणाला वेळ नाही. आणि ते आश्चर्याने भरुन गेलेले, त्या श्लोकामुळे.

म्हणजे, मी भगवंताला कृपापात्र झालो की निर्धन होणार की काय? किंवा हे घर, (जे आपण मोठया श्रमाने बांधलं) आणि भौतिक संपत्ती आणि रोकड आणि वाहन आणि भोवतालचं हे सगळं, हे सगळं ' शनै शनै ' हरण केलं जाईल? किंवा माझं शरीर, माझे हे दोन हात आणि पाय? आणि डोकं? त्यातले विचार? स्वप्नं (जी वारंवार पडतात अलीकडे, सांगण्यासारखी - न सांगण्यासारखी) ही जर संपत्ती मानली (मानली?) तर ती 'हरण' केली जाईल, मी जर कृपापात्र झालो तर? मग शिल्लक काय उरणार? काय अर्थ आहे याचा?

त्यांनी चाहुल घेतली तर मंजिरी बाहेर गेलेली. म्हणजे तिच्या 'वर्कशॉप' ला, समाजशात्राच्या. कसलीशी फाईल नेली आहे. टिपणं नेली आहेत. दुपारनंतर तिला आणखिन एका चर्चासत्राला जायचंय. तिला तेथे घेऊन जायची जबाबदारी आपली. मुलगी अजुन आलेली नाहीये. कुणाला वेळ नाही श्लोक ऐकयला. तसा तो सांगण्यासारखा नाही आहे म्हणा.

मनोहरशास्त्री शेजारी राहतात. तिसऱ्या मुलाने घेतलेली नविन मोटरकार ते कौतुकाने पुसताहेत. त्यावरं निळी फुलं पाकळया-पाकळयांनी पडताहेत. त्यांच्या चेहेऱ्यावर हासु. मऊ असं. पुस्तकातल्या त्या श्लोकाकडे पाहत त्यांनी, ते पुस्तक हातात घेऊनच चालायला सुरुवात केली बाहेर येऊन, शास्त्रींच्या दिशेने. शास्त्रींना

थोडं आश्चर्य वाटलं.

' का हो? '

' काय, कामात? '

' काम?... अहो, हे प्रेमाचं काम! ' शास्त्री म्हणाले.

ते शास्त्रींकडे पाहत उभे, पुस्तकं चाळत. शास्त्री कौतुकाने भिजलेले. शास्त्रींबरोबर चर्चा होते बहुधा अनेकदा. पण शास्त्री टाळायलाच बघतात, अनेकदा. त्यांना त्या श्लोकाचा अर्थ विचारायचा आहे.

' का, हो? '

त्यांनी सांगितलं. श्लोकही वाचुन दाखविला. शंकाही बोलुन दाखवली.

' काय याचा अर्थ? '

' अहो तो गुढार्थ असतो.' शास्त्री म्हणाले.

' म्हणजे मी कृपावंताची करुणा भाकायची!... त्याने कृपा केली की माझं धन नष्ट होणार?... हे कोणतं जस्टिस आहे? '

' जस्टिस? तुम्ही रिटायर होऊन किती दिवस झाले? '

'मीच राजीनामा दिला! साले हरामखोर... '

' कोण? '

' तेच! '

शास्त्रीनी गाडी पुसण्याचे काम चालु ठेवलं. डोळयांच्या कोपरातुन पाहिलं, चाचरत म्हटलं,

' भगवंताची वाणी आहे...'

' हो! '

' समजुन घ्यायची असते...'

' कृष्ण सुर आहे! ... तो आसुरी संपत्ती विरुध्दच बोलणार...! म्हणजे एखादयाने असात्विक असं अनैतिक धन गोळा केलं असेल तर कृष्ण भगवान कृपावंत होऊन असुरी धनाचा नाश करणार... असचं ना? '

' थोडसं बरोबर आहे. ' शास्त्री म्हणाले.

' पण यात जस्टिस नाही.'

'जस्टिस? '

' हळुहळु तुम्ही माझं धन हरण करणार, म्हणजे पळवणार? मग मी सुखी होईन? ' शास्त्री कसंनुसं हसतात. विषय बदलण्याचा प्रयत्न करतात.

' सुबोधने ही नवी गाडी घेतली बघा! '

' हो!... पेढे मिळाले ना!... तिसरा मुलगा ना? '

' हो! ' शास्त्री म्हणाले.

' कितवी गाडी, त्याची? दुसरी? '

' हं '

' कमी वयात चांगली संपत्ती मिळवली आहे त्याने! '

शास्त्री त्यावर अस्वस्थ दिसु लागतात. गाडी पुसताना म्हणतात,

' पुढचे मागचे संदर्भ बघावे लागतात... अर्थ गुढार्थ असतो. तुमची तब्येत कशी असते?... आजकाल?' मग

सूचकपणे पाहु लागतात.'

त्यावर त्यांनी पुस्तक चाळलं. ते न बोलता परत फिरले. चालत राहिले... पुढचे मागचे संदर्भ!... त्यांनी स्वत:शीच म्हटलं, निळी फुलं पाहत.

मुलगी आलेली आहे. ती खुष आहे. त्याची दोन कारणं. एक तिच्या मित्राचा फोन. दुसरं, मंजिरीला वर्क शॉपला बोलवणं यायला लागल आहे. ते तिला श्लोक सांगतात. ती ऐकते. विचार करते आणि म्हणते,

'म्हणजे काऽऽय?'

आणि ती जाते. तिलासुध्दा जायचे आहे. तिलाही वेळ नाही. ज्या ज्या वेळेस अडचणी येतात, त्या त्या वेळेस आपण भगवंतांची करुणा भाकली आहे हे त्यांना आठवतं. ते पुस्तक थोडं भयाने घट्ट धरतात.

थोडया वेळाने त्यांनी फोन केला, जुन्या मित्राला. त्यालाही सांगितलं श्लोकाबद्दल. अर्थही सांगितला. विचारलं,

' असं कसं असेल?... तुला काय वाटतं? '

मित्र आजोबा झाला आहे. त्याला वेळ नाही. नातू म्हणजे व्याजावरचं व्याज, त्याचं म्हणणं. त्याला श्लोक ऐकायला वेळ नाही. तो कौटुंबिक डयुटी करतो आहे. सुखाने तुडुंब आहे.

' नंतर बोलु...नंतर! '

पण मित्राला उत्सुकता नाही. नंतर म्हणजे कधीच नाही असा अर्थ.

मुलगी निघून गेली आहे. तिला घाई आहे. मंजिरी मघाशीच गेलीय आणि तिला दुसऱ्या सत्रासाठी न्यायचय आपल्याला. गॅलरीत फिक्कट निळी फुलं पडताहेत. राजीनामा दिल्याचं दुखः नाही पण तो दयावा लागला अपमानित करुन, याचं जळणार दुखः आहे. त्या दिवशी असाच निळया रंगाचा सुट घातला होता. आणि बॉसचं थोडं चिडवणार हासू. त्यांनी पुस्तक टेबलावर ठेवून दिले. त्यावर ती निळी फुलं ठेवली. कारची चावी घेतली. ते बाहेर पडले.

कॉलनीत रस्त्यावर उत्सव चालला आहे. आरास आहे. संगीत आहे. एक टकल्या मध्यमवयाचा माणूस नाचतो आहे. एकटाच, आत्ममग्न असा. त्याच्याभोवती कोणी नाही. कोणी पाहत नाही. ' टण्णांग-टण्णांग-टण्णांग-टणाऽऽ-टणाऽऽ ' तीस तोळयांची माळ गणपतीच्या गळयात घातली आहे. गोंडा चौरंगी आहे. गणपती हासतो आहे. त्यांच्या लक्षात येतं, त्या नाचणाऱ्याच्या डोळयांत अश्रु आहेत. कदाचित त्याला घरची आठवण झाली असणार. तो इथं एकटा असणार. तो रडतोय. तो नाचतोय. गणपतीचा गोंडा....

त्यांनी कार बाहेर काढली आणि थांबवली; एका ' रेस्तारॉं ' समोर. भूक लागली आहे वाटत थोडी. ज्यानी मला राजिनामा दयायला लावला त्या हरामखोरांवर भगवंतांने का कृपा केली नाही?... पण इतका स्वस्त अर्थ नसणारच याचा. पण मग काय अर्थ आहे त्याचा?... मी ज्याच्यावर कृपा करतो त्याची संपत्ती...

सामोसा आणि कॉफी. या वेळेला हेच खाद्य पुरेसं आहे. समोर टेलिव्हिजनचा मोठा पडदा. जुना कृष्णधवल

रंगाचा हिंदी सिनेमा चालु आहे. (इथेही कृष्णच). कोणी पाहत नाही हा सिनेमा. तरीही चालूच. एक स्त्री पुरुषाची जोडी व्यवस्थित जेवण करते आहे. बरोबरची बाईसुध्दा नाजुकपणे दारू पिते आहे. तिथे अशोककुमार प्रसिध्द असं खिन्न-छद्मी ' हसतो आहे. एक बाई तिच्या तरुण होऊ लागलेल्या मुलीबरोबर बसुन आहे. उदास अशी. मुलगी अधुनमधुन सिनेमा बघत आहे. दूर संगीत. रस्त्यावरच्या उत्सवाचं... टण्णांग-टण्णांग-टण्णांग-टणाऽऽ-टणाऽऽ '

त्यांनी घडयाळात पाहिलं. वेळ आहे, अजुन वेळ आहे, 'इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस' कडे जायला. थोडा वेळ बसूनच राहवं लागणार. एक सूट घातलेला माणूस दुःखाने कुठल्याशा 'ॲक्ट' बद्दल बोलतोय. शासनाच्या धोरणामुळे त्याचं मोठं नुकसान होतं आहे. तो देखील सिनेमा पाहत नाही.

सिनेमातल्या विमानात बिघाड झाला आहे. विमान जबरजस्तीने उतरवावं लागणार आहे. नायिका अशोककुमारला बिलगुन बसली आहे भितीमुळे. विचारतेय की त्याला मरणाची भिती वाटत नाही का? तो म्हणतोय (धीरोदात्तपणे) की त्याला मरणाची भिती वाटत नाही, पण हाती घेतलेलं कार्य अपूर्ण राहणार. समोर (सिनेमातला) एक प्रवासी शीळ घालतोय अशा प्रसंगातही. त्याच्या मागच्या सीटवर मारवाडी प्रवासी विचारतो आहे की त्याला मरणाची भिती वाटत नाहीये का? प्रवासी नाही म्हणतोय. मग तो मारवाडी त्या शीळ घालणाऱ्याला दोन्ही हातांनी मारु लागतो. आक्रोशसदृश घुसमटत्या आवाजात विचारतो,

'क्यूं नहीं...क्यूं नहीं?'

मरणाची सगळयांना भिती वाटली पाहिजे. का वाटत नाही मरणाची भिती?... का नाही.

पडद्यावरच्या अचानक हालचालीमुळे त्या मुलीचं लक्ष वेधल जातं आहे. ती म्हणतेय की हे जस्टिस नाही. एखाद्याला मरणाची भिती का वाटली पाहिजे? आणि नाही वाटली तर ती वाटायला पाहिजे असा आग्रह धरणं हे जस्टिस नाही... मी ज्याच्यावर कृपा करतो त्याची संपत्ती शनै शनै नष्ट करतो...भिती इत्यादीचं आवरणदेखील काढुन घेतलं जातं काय?... उदास स्त्री मुलीला म्हणतेय की जस्टिस इज् नॉट ऑलवेज अ जस्टिस! म्हणजे ही बाई काही अंशी दार्शनिक आहे. इथं सामोसा खाते आहे. अशोककुमार ' खिन्न-छद्मी ' ' असं हासतो आहे. दूरवर रस्त्यावरचं संगीत. मंजिरी 'सोशल जस्टिस' या विषयावरच बोलणार आहे... बोलत असेल आता. सिनेमातली मारामारी आता सुटली आहे. जायची वेळ झाली आहे.

धावणारी कार. ते अशोककुमारचं ' खिन्न-छद्मी ' हास्य आपल्याला आवडत आलं आहे. त्यांनी आरसा फिरवला. त्यात स्वतःला पाहिलं. तसं हसून सुध्दा बघितलं. जुना जमाना झाला आता, जुना जमाना झाला.

आता अलिकडे सगळे बुध्दीवादी व्याख्या करतात. तिकडे मंजिरी सुध्दा व्याख्या करत असेल. तर, आधी हे ठरवावं लागेल की माझ्या संपत्तीत जे जे म्हणून गणलं जातं त्यावर माझा अधिकार आहे काय? दुसरं, माझी संपत्ती म्हणजे कोणाची. आणि धनाची व्याख्या पण करावी लागेल. म्हणजे धन म्हणजे नातेसंबंध सुध्दा का?... तो काळा देव शनै शनै म्हणून काय काढुन घेणार? म्हणजे त्याने पण काही 'प्रायॉरिटीज्' ठरवल्या असणार.

राजीनामा दिल्यामुळे (द्यावा लागल्यामुळे) आता नोकरीचं व्यवधान नाही. त्यामुळे बॉसचा व्देष नाही, सहकाऱ्यांचा हेवा नाही, खऱ्या खोटया उपाध्यांमध्ये आता गुंतणं नाही. हे सर्व तो काढुन घेतो आहे का?... नाही, धनाची व्याख्या करावी लागेल.

एक नागडं मूल रस्त्यावर धावत जातं आणि ब्रेक मारावे लागतात. रस्त्यावर उत्सव. नंतर कारचं 'इन्स्टिटयूट' मध्ये शिरणं.

तिथल्या खूपशा झाडांमध्ये त्यांनी कार लावली आणि ते व्हिजिटरूम मध्ये पोहोचले. तिथं दोघं तिघं बसुन. बहुधा कोणाला तरी नेण्यासाठी आलेले. मध्ये काच. पलीकडे चर्चा चाललेली. मंजिरी दिसते आहे. ती ऊठून मधूनमधून मुद्दे मांडते आहे. बाकीची मंडळी मुद्दे खोडताहेत. विषय आहे सामाजिक न्याय... सोशल जस्टिस. तर, पहिल्यांदा व्याख्या करावी लागेल, हो ना? आणि सोशल जस्टिस कोणासाठी हे ही पाहावं लागेल. म्हणजे वंचित वर्ग डोळयासमोर आहेच. तर व्याख्या करावी लागेल व्याख्या. सगळी चर्चा इंग्रजीत चाललेली. आणि डोळयासमोर 'मराठी मुलखातला वंचित वर्ग' आहे. जेथे सामाजिक अन्याय आहे तो दूर करणे म्हणजे सामाजिक न्याय, डॉ. रमैया सांगतात. इतर तुटुन पडतात. म्हणतात की, नकारात्मक व्याख्या झाली ही. छे! नीट व्याख्या करावी लागेल, व्याख्या.

ते खुर्चीवर बसले. चर्चा ऐकत राहिले. अशोककुमारसारखं ' खिन्न-छद्‌मी ' हसून पाहिलं त्यांनी काचेच्या पलीकडे. एकाच्या लक्षात आलं. सहानुभूतीने त्याने इंग्रजीत म्हटलं,
'अर्केडमीशियन्स आहेत सगळे!'
मंजिरी हिरीरीने इंग्रजीत मुद्‌दे मांडतेय. फळयावर लिहीते आहे. तिचं म्हणणं की सामाजिक न्याय या संकल्पनेची व्याप्ती मोठी आहे. व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक न्याय इथे अभिप्रेत आहे. एकजण शेरा मारतो की त्यात नविन काय आहे? पण मंजिरी ऐकत नाही. ती म्हणते, विकासाची समान संधी, समता, बंधूभाव...
'मग हे घटक व्याख्येत धरुया का?'
'हो व्याख्या ठरवावी लागेल, व्याख्या' आणि 'वंचित वर्ग' म्हणजे कोण?... कोण वंचित आहे? काचेपलिकडे हे सर्व चालले आहे?
'तुम्हाला पाहिलय कुठतरी!'
ढेरपोटया, टाय लावलेला माणूस म्हणतो. ते थोडं दचकतात. मग स्वतःची ओळख करुन देतात.
ढेरपोटयाची बॉसकडुन ओळख निघाली आहे. त्यांनी हसून कडवटपणे म्हटलं,
'अच्छा म्हणजे माझ्यावर स्पाइंग करायचे त्यांनी अजुनही थांबवलं नाही तर ! ... मी आता बाहेर पडलोय!'
ढेरपोटयाही हसला. त्याला काय समजलं, ते त्यांना नाही समजल. पण त्याने म्हटलं,
'लाइफ् इज लाइक दॅट!... बिचारा अडचणीत आहे.'
'अं? काय?"
'बॉसच्या मुलाला ! यु नो. बी -पॉझिटिव्ह रक्तगटाची लगेच गरज आहे! बिचारा अडचणीत आहे.'
'मुलाबद्‌दल सहानुभूती! पण बॉस काही बिचारा नाही!... तुम्ही त्याचे मित्र का?'

ढेरपोटया सूचक हासतो. होकार नकार काहीच देत नाही. तिकडे काचेपलीकडे जीवनावर गंभीर विचार होतो आहे. मंजिरी म्हणतेच की प्रत्येक 'इंडिव्हिज्युअल्' ला समजून घेतलं पाहिजे. डॉ. रमैया म्हणतात की 'वंचित वर्ग' कोण ते ठरवूया. सगळेच बोलताहेत. माईकमधून. त्यांचा सर्वांचा आवाज येतो. सगळे विव्दान एकाचवेळी बोलताहेत! 'वंचित वर्ग' कोणाला म्हणायचं? भिकारी-भिकऱ्याची मुलं. वेश्या-वेश्यांची मुलं. एच. आय. व्ही. पॉझिटिव्ह वाले. दुबळा गरीब वर्ग. दारुचे व्यसनी?... होय! होय!... नाही! नाही!... आणि मंजिरी म्हणते आहे की प्रत्येकाला समजून घेतलं पाहिजे. तिने आपल्याला, आपण तिला समजू शकलो?
ढेरपोटयाने कंटाळुन आळस दिला. म्हटलं,
'मला कंटाळा आला आहे! कधी संपणार हे?
'म्हणजे व्याख्या करणं?, चर्चा करणं? की वाट पाहणं?' ढेरपोटया हसला. म्हणाला,
'कंटाळा... कंटाळा आला आहे. हे लोक आपल्याला चहा का पाजत नाहीत?'
माईकमधून 'चहा-चहा' असा इंग्रजी कल्लोळ ऐकू येतो. कुणीतरी विनोद केला असणार. मंजिरीचा आवाज येतो आहे. ती वाद घालतेय. तिचं म्हणणं, व्याख्या पुरेशी नाही. 'सोशल सिक्युरिटी' चा मुद्दा आहेच. अतिवृध्दांना 'वंचित वर्गात' सामावेश पाहिजे आहे. काम न करणाऱ्या 'ऐतखाऊ' समाजातल्या वर्गावर ती टीका करते आहे. समाजशात्र विस्तृत होत आहे. पुन्हा त्यांना आठवतं. अशोककुमारचं तस सूचक आवाहक, पण ' खिन्न-छद्मी ' हास्य. आणि तो प्रश्न, मृत्युची भिती का वाटत नाही... का नाही?
आणि तो तिचा 'ऐतखाऊ' शब्द.
मध्येच दोघं उठून गेले आणि ढेरपोटया अस्वस्थ दिसू लागला. त्यांनी ढेरपोटयाकडे सहानुभूतीने पाहत म्हटलं,
'हे लोक आपल्याला चहा देतील असं वाटत नाही!... पण मी राजीनामा का दिला ते सांगू का?'
'आय नो...'
'नाही तुम्हाला माहीत नाही!... खर तर मला त्याचा चेहेरा आवडत नव्हता!... पण मी राजीनामा दिला म्हणजे मी निकम्मा झालो काय?'
'छे...छे!'
'खरं तर त्यांनी मला जखमी करुन...'
'जखमी?"
'म्हणजे तस नाही हो! पण मी तुम्हांला तो श्लोक सांगतो'
'श्लोक?... इथे कोणाला संस्कृत येतं आहे.'
'अर्थ सांगतो...'
त्यांनी सांगायला सुरूवात केली. श्लोकही सांगितला... मी ज्याच्यावर कृपा करतो... तिकडे काचेच्या पलीकडे 'जस्टीस... जस्टीस' चा शोर... व्याख्या केली पाहिजे, व्याख्या. धनाची व्याख्या करा, मालकीची व्याख्या करा. न्यायाची व्याख्या करा.
ढेरपोटया अचानक बुध्दीमान आणि विचारी दिसू लागतो. तो डोकं खाजवतो. संचित होतो. म्हणतो,
'मला तुम्ही कॉलेजच्या जुन्या जमान्यात ढकललं आहे!... जर नातेसंबंध, रिलेशन्सचा समावेश धनात केला तर? त्यातून गुरं आणि स्त्रिया यांची गणना पूर्वी धनात केली जात होतीच!'
'रिलेशन्स!'
'येस!... मग भगवान जस्टिस कुठे करताहेत?... इज इट फेअर?'

'लादलेला एकटेपणा हा देखील अन्याय असू शकतो ना?'
'या!... सांगतो तुम्हाला, माझा डायव्होर्स झाला!... तेंव्हा'
'किंवा स्वातंत्र्य हे धन असू शकेल काय?'
'माझा डायव्होर्स...'
'किंवा निर्णय प्रक्रियेतले तुमचे स्थान'... व्याख्या... व्याख्या... व्याख्या करा. पलीकडचा कल्लोळ.
'आय डोंट नो!... मला चहा हवा आहे.'
त्यांनी काचेआडून पाहिलं. मंजिरीकडे. ती अजूनही बोलतेय. त्यांनी ढेरपोटयाकडे पाहिलं, नीट. तो त्यांना दुःखी दिसला. बहुधा त्याला त्याचा डायव्होर्स आठवला असावा. मी ज्याच्यावर कृपा करतो त्याचं धन हळूहळू काढून घेतो. म्हणजे त्याचे नातेसंबंध त्याचं भौतिक धन... आणि त्याचं मन?...विकासाची समान संधी, समता, बंधुभाव... जस्टीस...जस्टीस... द टी हॅज कम!
काचेआडचा कल्लोळ आणि इकडे कोणीतरी लोकांना चहा आणून दिला. ढेरपोटयाजवळ 'इस्कॉन' चं पुस्तक. त्यावरचं भगवान श्रीकृष्णाचं मोठं छानसं चित्रं.
'तुम्ही ते वाचतायं?'
'नो...नो!... कुणीतरी दिलं मला! का?'
'खरा वैष्णव चहा पीत नाही!'
'म्हणजे?'
'ती एक हकीकत आहे!'
'अं?'
ते सांगतात. ढेरपोटयाला. तो ऐकतो. मन लावून सांगतात की, त्या संस्थापकांना वाटत असे की आपल्या पत्नीने आपल्या भक्तीकार्यात मदत करावी, रस घ्यावा. लोक त्यांना भेटायला येत तेंव्हा एका खोलीत भक्तीरसावर चर्चा चाले. दुसऱ्या खोलीत त्यांची पत्नी इतरांबरोबर चहा पीत बसे.
'चहा?'
'हो!... त्या काळात भारतात चहाचं मोठ प्रस्थ होतं. फॅशन होती... पण पुढे ऐका.
संस्थापकांनी पत्नीला समजावलं, की मला सोडा किंवा चहाला. म्हणजे निर्वाणीचा इशाराच. पत्नीने थट्टेने म्हटलं की मग नवऱ्यालाच सोडावं लागेल ना!
'मग?'
एकदा त्यांच्या पत्नीने श्रीमद्भागवत ग्रंथचं विकुन चहाची भुकटी विकत आणली. नंतर त्यांनी संन्यासच घेतला. त्यांना हसू येत आहे. आतुन... मनातुन या मुद्यावर. म्हणजे चहाचा, ग्रंथविक्रीचा आणि सत्याचा क्रम लक्षात घेऊन. पण नंतर ते एकदम गंभीर होतात. ढेरपोटयाही सचिंत दिसू लागतो.
'मला हे विचित्र वाटतंय!'
'पण यात अर्थ आहे!... सामान्यतः संसारी बाई चहासाठी काहीतरी विकेल नाही का?... ग्रंथच का?... सो अ मीनिंगफुल जस्टीस इज हिड्न'
'न्याय? म्हणजे चहा आणि ग्रंथ एकसमान?'
'तसं तिला दाखवून द्यायचं असावं!... मला ती बुध्दीमान वाटते!... पण त्यांनी पलायनच केलं!'
'त्यांच्या लक्षात आलं नाही?'

'ती त्यांना चहा पाजू शकली नाही!... ते तिला भक्तिरस पाजू शकले नाहीत!... हीच भगवंतांची कृपा?...धन हिरावणं?... यात जस्टिस कुठं आहे?'
'त्या बाईवर अन्याय झाला अस मला वाटतं!'
व्याख्या... व्याख्या... धनाची व्याख्या... वंचितांची व्याख्या... डॉ. रमैया... डॉ. हिरामण, ... डॉ. अमुक... डॉ. मंजिरी... बोला! बोला!... बट द टी हॅज कम...
ढेरपोटयाने ते पुस्तक चिमटीत पकडलं. दूर ठेवलं. नंतर हसून चहा पिताना म्हटलं,
'मग नकोय मला ते पुस्तक!'

'सेशन' संपल आहे. व्याख्या झालेली नाही. न्याय संपलेला नाहीये. चर्चा संपलेली नाही. सत्र संपलं आहे. आपली प्रतिष्ठा धुळीला मिळाली, आपल्याला दुष्टपणे, टॉर्चर करून राजीनामा द्यायला लावला, त्यामुळे आपलं मानसिक नुकसान झालं आहे हे त्यांना कदाचित सांगायचं आहे ढेरपोटयाला, कारण तो बॉसच्या ओळखीचा आहे. कदाचित ढेरपोटयाला आपल्या 'डायव्होर्स' बद्दल सांगायचे आहे. कदाचित श्लोकाच्या अर्थावर चर्चा करायची आहे त्यांना. नाराज होऊन त्यांना विचारायचंय की, जर माझ्यावर कृपा झाली तर भगवान माझं धन हरण करणार म्हणजे काय करणार? माझी प्रतिष्ठा, माही महत्वाकांक्षा, माझे विचार, माझी बायको आणि मुलं, घर, गाडी इत्यादी भौतिक संपत्ती, माझं स्वातंत्र्य, माझी निर्णयशक्ती, निद्राक्षमता, क्षुधा, भोग... या सर्वांपासुन दूर नेणार? हा कसला न्याय?... पण चर्चा होत नाही. कारण चर्चा शिल्लक असली तरी सत्र संपलं आहे. व्याख्या करण्याची शिल्लक आहे. धनाची व्याख्या करणं शिल्लक आहे. न्यायाची व्याख्या करणं शिल्लक आहे. ढेरपोटया आपल्या मुलाबद्दल सांगताना गप्प झाला आहे. त्याच्या मुलाने बहुधा त्याला लाथ मारली आहे. पण आता चर्चासत्र संपल आहे. चहाच्या व्देष करणाऱ्या एका संस्थापकाचं पुस्तक फडफडत आहे वाऱ्याने. ते जगभर गेलं आहे. न्याय झाला नाही, चर्चासत्र संपलं आहे.

औपचारिकता आटोपून मंजिरी बाहेर आली तसं त्यांनी थोडं नाटकीपणे तिचं स्वागत करून गाडीपर्यंत नेलं. नाइलाजाने थोडं हसून, निषेधात्मक असं पाहून तिने भुवया उंचावल्या. मग इतरत्र पाहिलं की, कुणी पहात तर नाही,
'हे काय चाललंय?'
'तू जस्टीसची व्याख्या नीट मांडली नाहीस!'
'तुम्ही ऐकलं वाटतं!'
'सध्या मी तेवढचं करु शकतो!'
तिने एकदम त्यांच्याकडे पाहिलं, तीव्रपणे. तिच्या मनावर ओरखडा उठला असणार.
धावणाऱ्या गाडीत निळया फुलांचा उग्र गोड वास पसरला, दरवळतोय दोघांत. तिने खोल श्वास घेतला. म्हटलं,
'राजीनाम्याचं दुःख नाही!... तुम्हांलाही विश्रांती पाहिजेच होती!... पण तुम्ही कडवट होत चाललात!'
'छे...छे!'
'इतरांना किती व कशाला दोष देणार?'
'मी काही भांडत फिरत नाही!'

'तुम्ही शास्त्रींना टोमणे मारले ना?'

'अरेच्या!... त्यांनी एवढयात फोन पण केला का?'...

म्हणजे तिसऱ्या मुलाची तरुणपणातली दुसरी कार, ही आसुरी संपत्ती आहे असे मी म्हणालो का त्यांना?... पण म्हणायला पाहिजे होतं!... कारण हे भागवत धर्माचे प्रचारक...'

'नाऊ लुक्! ... आता तो श्लोक काय घेऊन बसलात'

'मला त्याचा अर्थ हवा आहे.'

'इतर लोक आपापल्या कामात असतात हा काय त्यांचा गुन्हा?'

'मी असं कुठे म्हणतोय?'

'मागचं सगळं विसरुन जा!... ते अपमान वगैरे...'

त्यांनी गाडीला वेग दिला. पुन्हा निळी फुल झाडावरची. त्याचे गुच्छ, पाकळया गाडीवर पडताहेत. त्यांचा एक विशिष्ट वास.

राजीनाम्याच्या त्या दिवसांत अशीच फुलं होती निळी. त्या दिवशीचे कपडे निळे होते; अशीच वेदना होती.

'मला सन्मानाने जगण्याचा हक्क होता... आहे! त्यांनी कारस्थान केलं!... सगळं ठरवून!... ते दोषी आहेत.'

'तुम्ही... बॉसचा अजुनही व्देष करता?'

'आय डोंट नो... येस परहॅप्स!'

'तुम्ही तुमच्या एक्स बॉसला अजूनही ... फोन करता?'

'कोण म्हणालं?'

तिनं उत्तर दिलं नाही. गप्प राहिली. झाडं पळताहेत, वाऱ्याने केस उडताहेत. टिपणीचे कागद फडफडताहेत. त्यात जस्टिसची व्याख्या आहे. अर्धवट अशी.

तुम्ही इतरांना टॉर्चर करता आणि स्वतःलाही!... आपलं बरोबर, इतरांचं चूक!... हे सोडलं पाहिजे!'

त्यांनी आत्मक्लेषी असं, आणि दार्शनिक असं, स्वतःशीच स्मित केलं. 'इन्स्टिटयूट' जवळ येते आहे. वेळ थोडा आहे, नेहमीच थोडा असतो. काहीतरी चुकतंय. चुकत चाललंय. काहीतरी, कसलातरी गहिवर गळयात दाटतोय.

तिनं म्हटलं, कसंबंस. थोडं कष्टाने,

'तुम्ही मुकुंदाला फोन केला होतात का?'

मुकुंदा त्यांचा मुलगा आहे. तो वेगळा राहतो आहे. असावी त्याप्रमाणे, त्याची महत्वाकांक्षा वेगवान रूप धारण करतेय. आणि याचं म्हणणं असं की कालप्रवाहाच्या वेगवान धारेत सापडून आपण सुटे-सुटे होऊन हळू हळू एकेकटे होतो आहोत. परस्परांपासून दूर चाललो आहोत. किती भयप्रद कल्पना! आणि आता हा श्लोक आहे त्यांच्या डोक्यात. पुन्हा वारं. पुन्हा फडफडता पदर. फडफडती पानं वहीची. फडफडती व्याख्या. न्याय अन्यायाची चर्चा... आणि झाडावरची निळी फुलं.

'केला नाही!... पण करणार आहे. माझ्या गुडघ्याच्या दुखण्याचा विचार न करता त्याने थेट पाचव्या मजल्यावरचा फ्लॅट बुक केलाय!... तिथं लिफ्ट नाही!... म्हणजे मी तिथं जायचं नाही!... भगवंतांची माझ्यावर कृपा झाली.'

ती क्षणभर डोळे मिटून घेते. सहन करते. सोशिकपणे म्हणते,

' फ्लॅट उपलब्धतेनुसार मिळतो आजकाल!.... त्याने असला विचार केलेला नाही.'

'त्याचा सासरा त्याच्याबरोबर राहणार आहे. म्हणजे त्याने त्यांचाच विचार केला आहे.'
ती काही बोलत नाही. ते गाडीचा वेग कमी करतात. गरीब आईबापाचं श्रीमंत मूलं पुन्हा रस्त्यावर धावत जातं. पण ते मघाचं नसणार, कारण लोकशाहीत जनसंख्या जास्त आहे. ते थोडं हसतात, स्वतःच. ती निषेधाने त्यांच्याकडे पाहते. थोडी दुःखी होते. थोडं रागवते. आतल्या आत. तिला माहीत आहे. तिला माहीत आहे की त्यांनी मुद्दामच अशी समजूत करून घेतली आहे की मुलगा सासुरवाडीच्या तंत्राने चालतो. हा 'सिलीसॉरो' असून त्यांना 'क्षण कुरतडायला' उपयोगी पडत असतो हा वेडा विचार. तिने खोल श्वास घेतला. घडयाळात पाहिलं, म्हटलं,
'असा विचार तुम्ही करता आणि...'
'आय नो!... पण तो खडूस व्याही मुलाला माझ्यापासून दूर नेत असेल तर...'
'असं नाही!'
'नसेल!... पण असं असेल की आपण कालप्रवाहाच्या वेगवान धारेत सापडलोत आणि...'
'तुम्ही!... तुम्ही मुकुंदाला फोन करा!'
'मी भांडतोय का कुणाशी?... मी रिकामा आहे खरा, पण मला त्या श्लोकचा अर्थ समजावून घ्यायचाय...'
गाडीचा कमी होणारा वेग. तिने टाकलेला निःश्वास. टिपलेले डोळे. आपल्या हातातल्या टिपणीच्या कागदांना... फाईलला तिनं घट्ट पकडलं. त्यावर थोडं हसून नरमाईने त्यांनी म्हटलं,
'मी करतो त्याला फोन!'

आता एक वळण. एक तेच, या दिवसांत फुलुन येणारं झाडं आणि त्याची निळी फुलं, घरासमोर आहेत तशी. पुन्हा झाडी, पुन्हा 'इन्स्टिटयूट', पुन्हा चर्चा. पुन्हा व्याख्या. पुन्हा सामाजिक न्याय. पुन्हा 'वंचित वर्ग'. पुन्हा तेच विव्दान. कोणी आधीच पोहोचलेले. कोणी पोहोचणारे. कोणी 'डॉ. मंजिरी' शी बोलतंय, तिला गाडीतून उतरून घेण्यापूर्वीच. तिला सवड होत नाही त्यांच्याकडे पाहण्याची, निरोप घेण्याची. आणि 'भक्तिरस आणि चहा' ची नवी थिअरी सांगायला त्यांना वेळ होत नाही. गाडी चालूच राहाते. ते हळूहळू वेग देतात, गाडी न थांबवता. मंजिरी आधीच उतरून विव्दानांच्या इंग्रजी कोंडाळयात हरवलेली. ती डॉ. रमैयांशी बोलते आहे. त्यांच्यातली एक झाली आहे. तिला आता चर्चासत्रात (पुन्हा एकदा) सामाजिक, व्यक्तिगत, सामूहिक न्यायाची चर्चा करायची आहे. ती आता तिच्या सवडीने एकटी येईल. आपण आता मोकळे आहोत! मी ज्याच्यावर कृपा करतो... रस्त्यावर उत्सव. संगीत वाजतयं लोक नाचताहेत, का कुणास ठाऊक! टण्णाणा टणां टणां... गणपतीचा गोंडा...

पुन्हा तेच 'रेस्तारॉं ', इथं थोडं निवांत असतं. आपल्या नेहमीच्या जागेवर एक माणूस 'बका बका' खात बसलाय. पण ठीक आहे. इथं निवांत असतं. दोघ तिघचं आहेत. बाकी कोणी नाही. हो, टेलिव्हिजनवर एक सिनेमा आहेच, जुना, मुद्दाम लावलेला.

आता कॉफी आणि समोसा असं काही नको. आता थोडया वेळाने जायचंय. आणि फोन पण करायचा आहे. पण चहा चालेल. चहा म्हणजे 'मेडिटेशन' असतो. इथे अंधार आणि प्रकाश आहे. दूर रस्त्यावरचं संगीत आहे. घरही दूर नाही. खरं तर 'चहा आणि भक्तिरस' असेच व्दंव्द आहे. संसार आणि विरक्ती. संसार आणि

संन्यास.  इकडे संप्रदाय, संस्थापक सत्संग करीत.  त्याच्या शेजारच्या खोलीत पत्नी मित्रांबरोबर चहा करीत असे.  ती त्यांना चहा पाजू शकली नाही, ते पत्नीला भक्तिरस पाजू शकले नाहीत.  पण ती बुध्दीमान असावी.  क्षुद्रत्वाच्या पलीकडच्या शाश्वत सत्याकडे तिने कदाचित निर्देश केला असावा.  पण संस्थापकांना ते समजलंच नाही... पण आपण समजून घेत नसतो एकमेकांना.  आयुष्य सरतं.  कालप्रवाहाच्या वेगवान धारेत सापडून आपण सुटे सुटे एकटे एकटे होत जातो एकमेकांपासुन.  मग तुमचे तुम्ही नसता.  हीच भगवंतांची कृपा?

आणि ही थिअरी मनोहरशास्त्रींना सांगितली पाहिजे, चहाची.  कारण त्याच्याकडेही 'इस्कॉन' ची पुस्तकं आहेत.

मघाचांच सिनेमा आहे की काय?  आताही अशोककुमार पुन्हा दिसतोय  धुराच्या वलयात. पण नायिका वेगळीच आहे.  मधुबाला.  ती 'आईये मेहरबाँ' असं म्हणतेय.  अशा निमंत्रणाला तो बधत नाही.  छद्मीपणे पाहतोय, स्वतःशीच हसतोय.  त्याला माहितेय की माणूस एकटा एकटाच असतो.

त्यांनी खुर्चीवर बसवून आपली चौक्शी केली. 'द ट्रायल' की कुठल्या नावाच्या सिनेमा, नाटकाप्रमाणे.  त्यांनी कारस्थान केलं, त्यांनी ठरवून, एकत्र येऊन, साजिश करुन अपमानित केलं, जलीलं केलं (सिनेमात हाच शब्द वापरतात.)  राजीनामा द्यायला लावला होता.  तेंव्हा खूप खोल वेदना झाल्या होत्या.  तेंव्हाच आपण एकसुरे पडायला लागलो होतो.  कपडे निळे होते त्या दिवशी, निळी फुलं फुलली होती घरासमोर आणि रस्त्यावर आणि वसाहातीत.  बॉस असचं स्वतःशी छद्मी हसला होता.  तेंव्हापासुन प्रत्येकजण कामात आहे.  आपण नाही.

कुणीतरी चॅनल् बदललंय.  आता एका पुरोगामीवाल्या चॅनल्वर एक चर्चासत्र आहे.  वेश्याव्यवसायावरचं.  चार वक्ते आहेत. समोर स्टुडिओत बसलेले निमंत्रीत सहाभागी स्त्री पुरुष.  वत्त्यांत चक्क एक नेपाळी वेश्या.  ती म्हणते आहे की आपण सामाजिक न्याय करतो आहोत.  कारण नाहीतर सर्वत्र बलात्कार होतील.  प्रेक्षकातली एक बाई खवळलीय.  ती तारसुरात म्हणेय की यांचं दुकान बंद करा, त्यामुळे घर गृहस्थी बरबाद होतेय.  तिच्या आक्रोशात व्यक्तिगत वेदना असावी.  प्रेक्षकांना मजा येते आहे चर्चेत.  चॅनलवाल्यांचा हेतू सफल होतोय.  सगळे त्या बाईला गप्प करताहेत.  नेपाळी वेश्या तर्क मांडते आहे.  ती स्वतःला सेवा करणारी म्हणवतेय.  तिचा नितांत एकटेपणा तिच्या लक्षातच येत नाही आहे.  काल प्रवाह तिलाही ओढुन घेऊन जातो आहे.  पण चर्चा चालू आहे.  पुन्हा चॅनल् बदलल जातं.  पुन्हा मधुबाला, आणि अशोककुमारचं आत्ममग्न ज्ञानी असं हसणं.

शेवटी ज्ञानी असणं महत्वाचं.  घटनांमागचे अर्थ त्यामुळे समजतात.
कोपऱ्यातल्या बूथकडे हळूहू ते जातात. त्यांनी डोळे मिटले.  श्वास घेतला.  त्यांनी फोन लावला मुकुंदाला.
'तू पाचव्या मजल्यावरचा फ्लॅट बुक केला आहेस म्हणे...'
'अं... हो'
'माझा गुडघ्याचा रोग तुला आठवला नाही?  तिथं लिफ्टपण नाही.  म्हणजे मी यायचं नाही अशी व्यवस्था दिसतेय...'
'बाबा'

'आणि माझा खडूस व्याही तुझ्याबरोबर राहणार?'

मुलगा व्याकुळ झाला. त्याला राग पण आला असणार. तो दुखावला पण गेला असणार. तो सांगत राहिला की तुमच्या 'बघण्याचा दृष्टिकोन' चुकीचा आहे. प्रत्यक्षात तो ज्या कंपनीत काम करतो, तिथल्या सगळयांनी एकत्रपणे या अपार्टमेंटमध्ये फ्लॅट बुक केले आहेत. इथुन कंपनी जवळ पडणार आहे. त्यात पाचव्या मजल्यावर फ्लॅट मिळाला हयात त्याचा काय दोष? उपलब्धतेनुसार फ्लॅट घ्यावा लागतो. तुम्ही उगाच... इत्यादी इत्यादी. ते ऐकत राहिले. त्याचा युक्तिवाद त्यांना ऐकायचा नाहीये. त्याच्या आवाजातली प्रामाणिक कळकळ त्यांना ऐकायची आहे. ती त्यांना जाणवते आहे. इतकी पावती त्यांना पुरे वाटते.
'ओके!... मी ... आय ॲम जोकिंग...'
ते म्हणतात. पण मुलगा दुखावला आहे. सासऱ्याबाबतचा मुद्‌दा तो स्पष्ट करून सांगू इच्छितो. आपली भूमिका सांगू इच्छितो. ते ऐकतात आणि खरतर ऐकत नाहीत. निर्णयप्रक्रियेत तू मला सामिल करुन घेतलं नाही, किंवा मला विचारलं नाहीस, किंवा बायको तिच्या वडलांना डॅड् म्हणते, म्हणून तू त्यांना (खडूस व्याहयाला) डॅड का म्हणतोयस, असले प्रश्न ते विचारु शकले असते. पण ते मुलाचं बोलणं, त्या मागची तळमळ ऐकत राहिले. त्यांना दुःखही होतय, बरही वाटतंय. भरून येतय आतून. आणि शांतही वाटतय. काहीतरी उमजतंय, सापडतंयही. हळू हळू ते फोन ठेऊन देतात, मुलगा बोलत असतानाच. शांत उभे राहतात, स्वतःशीच.

त्यांनी पुन्हा फोन उचलला. नंबर तर पाठच होता. बॉस असेलच आता या वेळेला. मागच्या वेळेस म्हणाला, पुन्हा पुन्हा फोन करु नका. तक्रार करीन म्हणाला होता. आपण म्हटलं होतं की फोन करणं गुन्हा नाही. मी काही धमक्या देत नाही तुम्हांला... पण या वेळेस बॉस ऑफिस मध्ये नाही. घरीही नाही. आता मोबाईल. त्याला श्लोक सांगितला पाहिजे. नाहीतर 'चहावाली थिअरी'.

बॉसचा आवाज जो मेंदूत खोल शिरुन बसला आहे. नाटकी, व्यवसायिक. पण तरीही आता, वेगळा. थोडा थिजलेला.
'मी तुमचा प्रिय मित्र बोलतो आहे.'
बॉस ओळखत नाही पहिल्यांदा. तो काही वेगळचं पुटपुटतो, औपचारिकपणे पाहतो, पण ओळखतो तेव्हा त्याच्या घशात काहीतरी अडकतं. बॉसने फोन बंद करण्यापुर्वीच त्यांनी म्हटलं,
'तुमच्या फायद्याचं सांगतो! ... मुलाचा ब्लड ग्रुप काय? '
'मु ... मुलाचा...'
'ब्लड ग्रूप... ब्लडग्रुप! माझ्या राजीनाम्यानंतर बहिरे झालात काय?
'बी!... बी पॉझिटिव्ह!'
'माझा आहे!... मी तिथं येऊन देतोय आता!..
'... मी काही नेहमीचा डोनर नाही!... पण आज देणार आहे!... नाही... तुमच्यासाठी नाही!... मुलासाठी!...'
'आय विल बी...'
'हे सगळं मुलासाठी करतोय! माणूसकी म्हणून!... पण नंतर तुमच्या पार्श्वभागावर मला फटके मारायचे

आहेतच!... तो कार्यक्रम आपण नंतर करू कधीतरी!... एक श्लोक पण सांगायचाय बॉस!... पण कधीतरी!... आता येतोय मी...'

बॉस हॉस्पिटलचा पत्ता सांगतो. थरथरत 'थँक्यू' असं पुटपुटतो. ते फोन ठेवून देतात.

बूथच्या बाहेर. अजूनही टेलिव्हिजनवर चर्चा आहे. बूथच्या बाहेर येऊन ते अचानक उभे राहिले, शांत. अचानक आतुन काहीतरी समजतयं, जाणवतयं कसलीशी अनामिक शांतता. श्लोकाचा अर्थ अचानक उलगडून समोर येतोय, स्पष्ट होतोय. कसलंसं समाधान.

अर्थ असा आहे की, भगवंताची आपल्यावर कृपा झाली आहे. आपल्या भोवतालचे मायिक मोहजालाचे धागे तोडले जाताहेत. घन समजून जे बंध छातीशी कवटाळले, ते तुटताहेत... दूर होतायत. ही कृपाच. मुलगा त्याच्या प्राक्तनाकडे ओढला जातोय. त्याला आपली, आपल्याला त्याची आडकठी नको. आपण एका अर्थाने मुक्त होतो आहोत?... आणि भोवतालची माणसं कामात आहेत, एका गतीने व्याप्त आहेत. त्यांना सवडच नाही. आपण स्वतः स्थिर होतो आहोत. ही कृपाच. 'धनाचं' हरण होत आहे, शनै शनै!

आणि बॉसवर पण कृपा झाली असावी. शत्रूकडून निर्वाणीच्या प्रसंगी मदत स्वीकरताना अहंकराच्या ठिकऱ्या उडाल्या असणार. त्यानेही जे जपलं आयुष्यभर, ते आता हरण होतं आहे शनै शनै (... हरामखोर कसं 'थँक्यू थँक्यू' म्हणत होता.) हाच न्याय आहे वाटतं. व्याख्या करता येणार नाही असा न्याय. अमेय, अनिर्वचनीय... आपल्यावर कृपा झाली आहे...ज्यांच्यावर मी कृपा करतो त्यांची संपत्ती हरण करतो कलेकलेने...

जाताना त्याने 'रेस्तारॉं' च्या मालकाकडे 'दैवी हास्य' करून पाहिलं. अशोककुमारसारखं ज्ञानी, आत्मकेंद्री, छद्मी असं नाही. मालक आश्चर्याने पाहतो आहे. बाहेर संध्याकाळ होतेय.

त्यांनी कॉलनीसमोर निळया फुलांच्या झाडाखाली कार थांबवली. समोर रस्त्यावर उत्सव आहे. मघाचा एकाकी माणूस आताही नाचतोय. अजूनही नाचतोय. पण एकटाच. त्याच्या डोळयात अश्रू आहेत. कदाचित त्याला घरची आठवण येत असावी. लाऊडस्पीकरवर गाणं आहे. संगीत आहे. तीस तोळयांची माळ गणपतीच्या गळयात घातलीय. गोंडयाचा रंग चौरंगी आहे. गणपती हासतो आहे. ' टण्णांग-टण्णांग-टण्णांग-टणाऽऽ-टणाऽऽ ' , गणपतीचा गोंडा, नाचणारा तल्लीन, पण क्लेशमग्न, स्वतःतच नाचतोय, रडतोय. त्याच्या सोबतीने कोणी नाही. त्याला कोणी पाहत नाही.

ते कारमधून उतरले. जवळ गेले. पाहू लागले. त्याचा नाच. आत्मा म्हणतो मी नर्तक आहे. शरीर तर अविष्कृत होतं फक्त. सगळा तर नाच माझाच. आता भगवंताने हात पाय काढून घेतले तर नाचता येणार नाही, क्षमता राहणार नाही, पण इच्छा तर राहिल? (कारण आत्मा अमर आहे) आणि सगळं धन कलेकलेने हरण केलं तरी काय? कांद्याच्या एक एक पाकळया दूर कराव्यात आणि पोकळी राहावी अंतिमतः, तसं कलेकलेने सगळे बंध कापले गेले तर काय उरेल? स्वतः भगवंतच? तेच शुध्द स्वरुप! (की हे जास्त 'फिलॉसॉफिकल' होतंय?) पण नाचण्याचा हक्क तर भगवंत हिरावू शकत नाहीत. कारण नृत्य आनंद स्वरूप. नृत्य आत्म्याचा, भगवंताचा अविष्कार. नृत्य अंतिम सत्य. आणि आपल्यावर भगवंताची कृपा होतेय... मी ज्याच्यावर कृपा

करतो त्याची संपत्ती कलेकलेने हरण करतो... आणि हा निळया फुलांचा वास, आणि आपलं खुर्चीवर बसून अनेकांच्या कारस्थानी चौकशीला सामोरं जाणं, आणि वेदना स्वीकारणं. आणि आपण क्रमाक्रमाने सर्वांपासुन दूर जाणं. एकटं पडणं. आणि आता तर भगवंताची कृपाच झाल्याचा बोध होणं. हो तिकडे रक्तदान करायला जायचं आहे. तिकडे निकड आहे निकड.

त्यांनी पुढे होऊन त्या एकाकी माणसाबरोबर नाचायला सुरुवात केली. त्याला साथ केली पाहिजे ना टण्णांग, टणांऽ टणाऽ, गणपतीचा गोंडा. मनोहरशास्त्री भयभीत होऊन पाहत राहिले गॅलरीतुन. त्यांना आता मंजिरीला फोन करायचा आहे. आणि भोवताली गर्दी जमू लागली प्रतिष्ठितांची. ते नाचत राहिले, त्या हडकुळया, टकल्या, एकाकी माणसाबरोबर. पण आता दोघं आहेत तिथं, दोघं. दोघं नाचताहेत. साश्चर्य भयभीत गर्दी जमतेय. भगवंताची कृपा होते आहे. श्लोका चा अर्थ त्यांच्यात स्पष्ट होतोय. नृत्याचा जन्म होतो आहे. टणांग टण्णां टण्णां, गणपतीचा गोंडा... झाडावरून निळी फुलं पडताहेत. त्या नृत्यावर. त्या दोघांवर. ते नाचतायत, निःसंकोच, रस्त्यावर. वेदनेवर पडणारी निळी फुलं पाहत... आणि नृत्याचा जन्म झाला आहे. श्लोकाचा अर्थ ही समजतो आहे... नृत्य सुरू आहे... टणांग टण्णां टण्णां, गणपतीचा गोंडा...

---

प्रिय वाचक,
मराठीतील दर्जेदार साहित्य आपल्यापर्यंत पोहोचवायचा आमचा हा प्रयत्न आहे. आपला अभिप्राय आम्हांस (marathikatha@gmail.com) व लेखकास (bharatsasane@gmail.com) जरुर कळवावा.

Copyright ©
सर्व हक्क लेखकाकडे स्वाधीन. या कथेची soft copy आपण वापरु शकता. परंतु अन्य उपयोगासाठी लेखकाची परवानगी आवश्यक आहे.

Document no m0200140002